नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :१७/४/२०२५

–:परिपत्र:–

पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र.१ (के) अन्वये गुरूवार,दि.१७/४/२०२५ रोजी दुपारी ०४.३० (चार वाजून तीस मिनिटे) वाजता भरलेल्या माहे एप्रिल २०२५ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करून घेण्यात आलेले विषय.

विषय क्रमांक :– १/२७

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/२०४४,दि.२४/३/२०२५ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ४५,दि.१७/४/२०२५

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

पुणे पेठ आंबेगाव खु.,स.नं.८(पै) ९(पै) येथील पोस्ट ऑफिस आरक्षित जागा प्रवर अधिक्षक डाकघर, पुणे पश्चिम विभाग यांना पोस्ट ऑफिस कार्यालयास ५ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेबाबत व त्यांचेशी करारनामा करणेबाबतच्या खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे पेठ आंबेगाव खु.,स.नं.८(पै) ९(पै) येथील लेक व्हिस्टा सोसायटी, ग्राउंड फ्लोअर, O, बिल्डींग येथील तळ मजल्यावरील एकूण क्षेत्रफळ १००.४९ चौ.मी.पोस्ट ऑफिस आरक्षित गाळा मासिक भाडे र.रू.२८,७४२ (अक्षरी र.रू.अठ्ठावीस हजार सातशे बेचाळीस फक्त)अधिक शासकीय कर (दर ३ वर्षानी भाडेपट्ट्याच्या रकमेत सुधारणा करून वर्तमान भाडेपट्ट्याची रक्कम पाच टक्क्यांनी वाढ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याचे नूतनीकरण) नियम २०२३ मधील नियम क्र.३(III) (ब) मधील अटी शर्तीनुसार ५ वर्षे कालावधीसाठी ताबा दिनांकापासून पोस्ट ऑफिस वापराकरिता प्रवर अधिक्षक डाकघर, पुणे पश्चिम विभाग यांना भाडेतत्वावर देणेस.

२) प्रवर अधिक्षक डाकघर, पुणे पश्चिम विभाग यांचे समवेत नोंदणीकृत करारनामा करणेस.

विषय क्रमांक :– २/२८

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/२०४६,दि.२४/३/२०२५ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.४६,दि.१७/४/२०२५

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

पुणे पेठ शिवाजीनगर येथील स्वा.सावरकर भवन मनपा इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र.ओ–१ए मधील ५५० चौ.फुट क्षेत्र ५ वर्षे कालावधीकरिता देणेबाबतच्या खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे पेठ शिवाजीनगर येथील स्वा.सावरकर भवन मनपा इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र.ओ–१ ए, मधील ५५० चौ.फुट क्षेत्र ५ वर्षे कालावधीसाठी (दर तीन वर्षांनी भाडेपट्ट्याच्या रकमेत सुधारणा करून वर्तमान भाडेपट्ट्याच्या रकमेत ५ टक्क्यांनी वाढ करून आणि (iii) (अ) नुसार त्या प्रमाणात सुरक्षा अनामत रकमेत देखील वाढ करून) दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को–ऑपरेटीव्ह बँक लि.यांना मासिक भाडे र.रू.५३,३६३/– (अक्षरी र.रू.त्रेपन्न हजार तीनशे त्रेसष्ठ) (अधिक वस्तू व सेवा कर) याप्रमाणे ताबा दिनांकापासून ५ वर्ष कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देणेस.

२) दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को–ऑपरेटीव्ह बँक लि.यांचेकडून नियमानुसार शासकीय कर भरून घेणेस व नोंदणीकृत करारनामा करणेस.

३) दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को-ऑपरेटीव्ह बँक लि. यांचेकडून मासिक भाडे र.रू.५३,३६३/- (अक्षरी त्रेपन्न हजार तीनशे त्रेसष्ठ) (अधिक वस्तू व सेवा कर) याप्रमाणे तीन महिन्याचे भाडे इतकी सुरक्षा अनामत रक्कम रू.१,६०,०८९/- भरून घेणेस.

विषय क्रमांक :- ३/२९

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/३९,दि.१६/४/२०२५ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.४७,दि.१७/४/२०२५

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार -

पुणे महानगरपालिकेच्या येरवडा हॉट मिक्स प्लांटकरिता डांबरी (व्ही.जी.३०/४० ग्रेड) एल.डी.ओ.इमल्शन आर.एस.I, आर.एस.II महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये र.रू.१२ कोटी इतक्या रकमेची डांबर खरेदी करणेबाबत व खालील बाबी मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये डांबर, एल.डी.ओ. ही दोन्ही मटेरियल्स मे.हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो.लि.आणि.मे.भारत पेट्रोलियम कॉर्पो.लि.यांचेकडून एप्रिल ते जून २०२५ आवश्यकतेनुसार मुंबई येथील रिफायनरी मधून खरेदी पुढील निविदा मान्यते पर्यंत करणेस व सदरचा डांबरी माल रिफायनरी ते येरवडा हॉट मिक्स प्लांट पर्यंत पुणे महानगरपालिकेच्या मोटर वाहन विभागाच्या निविदेमधून वाहतूक करणेस.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये Emulsion RS-I व Emulsion RS-II हे मटेरियल्स मे.हिंदुस्थान कोलास कंपनी या कंपन्यांकडून एप्रिल ते जून २०२५ आवश्यकतेनुसार पुढील निविदा मान्यते पर्यंत खरेदी करणेस व सदरचा डांबरी माल रिफायनरी ते येरवडा हॉट मिक्स प्लांट पर्यंत पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाच्या निविदेमधून वाहतूक करणेस.

३) वरील मटेरीयल्स खरेदी पोटी मे.हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पो.लि. मे.भारत पेट्रोलियम कॉर्पो.लि.व मे.हिंदुस्थान कोलास प्रा.लि.या तिन्ही कंपन्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार अग्रिम (advance) रक्कम (र.रू.१२ कोटी पर्यंत)चेक आर.टी.जी.एस.स्वरूपात सन २०२५-२६ अंदाजपत्रकातील बजेट कोड क्र.SE15A106 (विशेष कार्याधिकारी पथ) या अर्थशीर्षकामधून अदा करणेस.

विषय क्रमांक :- ४/३०

संदर्भ- १) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.५१०,दि.२९/८/२०१८
२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९, मंत्रालय. मुंबई ४०००३२,दि.२ मे २०१७
३) भवन रचना कार्यालयाकडील आ.क्र.७७१२,दि.३०/१२/२०२२ रोजीचा श्री.सुभाष बाबुराव सणस यांचा अर्ज.
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/२०५३,दि.२५/३/२०२५ चे पत्र.
५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३,दि.११/४/२०२५

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुण्याचे पहिले महापौर कै.बाबुराव सणस व पुणे महानगरपालिकेचे पहिले आयुक्त स.गो.बर्वे यांचे अर्ध पुतळे पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या आवारातील उद्यानामध्ये बसविणेसाठी पुनश्च: मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे .

<u>विषय क्रमांक :– ५/३१</u>

संदर्भ– १) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.१३१,दि.११/७/२०१९
२) उद्यान विभागाकडील जा.क्र.मआ/उद्यान/३५१४,दि.९/१०/२०२४ अन्वयेचे पत्र.
३) मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पीएमसी–२०२३/प्र.क्र.१०/नवी–२२,दि.१७/२/२०२५ अन्वयेचे पत्र.
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उद्यान/१५,दि.४/४/२०२५ चे पत्र.
५) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४,दि.११/४/२०२५

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे, पेठ शिवाजीनगर, जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केल्याप्रमाणे छत्रपती श्री संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणेसाठी पुनश्च: मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

<u>विषय क्रमांक :– ६/३२</u>

संदर्भ– १) मा.मुख्य अभियंता पथ विभाग यांचे कार्यालयाकडील जा.क्र.पथ/१३१८६,दि.९/२/२०२४ रोजीचे पत्र
२) शहर अभियंता कार्यालय जा.क्र.शअजा/ज/५६६५,दि.२६/६/२०२४ रोजीचे पत्र.
३) मे.एंटरप्रायझेस डाटा पार्क्स प्रा.लि.यांचे या कार्यालयाकडील आ.क्र.५७१२,दि.२०/९/२०२४ रोजीचे पत्र.
४) शहर अभियंता कार्यालय जा.क्र.शअजा/१३३८४,दि.१८/१०/२०२४ रोजीचे कलम २०५ कमिटी बैठकीचे इतिवृत्त.
५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/२१,दि.४/४/२०२५ चे पत्र.
६) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.५,दि.११/४/२०२५

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

मुळा मुठा नदीवर सुरू असलेल्या मुंढवा आणि खराडी पुलालगतच्या पुणे मनपाच्या कब्रस्तानाकरीता खराडी स.नं.१६/४ब, या मिळकतीमधील निवासी क्षेत्रामधून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या नकाशानुसार ९.०० मी.रूंदीच्या रस्त्याची आखणी करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

<u>विषय क्रमांक :– ७/३३</u>

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीडीआर/२२,दि.४/४/२०२५ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.६, दि.११/४/२०२५

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२५ मध्ये खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

अ.क्र.	आरक्षणाचा स.नं.	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी. होल्डरचे नाव	टीडीआर झोन	७/१२ नुसार क्षेत्र	टीडीआर देय क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	पुणे आंबेगाव बु. स.नं. २८/९/३	प्रायमरी स्कूल (PS-57) आणि १२	दिलीप भानुदास बोरूडे	विरळ वस्ती	६५०.०० चौ.मी.	५४१.०० चौ.मी. x २.१५=	००६२८५	मार्च २०२५

		मी.रूंद डी.पी.रोड				११६३.१५ चौ.मी.		

<u>विषय क्रमांक :– ८/३४</u>

संदर्भ– १) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पुतळा १६/प्र.क्र.३०८/२९ मुंबई ४०००३२ दि.२ मे २०१७

२) पुणे महानगरपालिका मा.महापालिका मुख्य सभा ठराव क्र.१५४,दि.२८/६/२०१८

३) मा.उपमहापौर,डॉ.श्री.सिध्दार्थ धेंडे यांचे इकडील कार्यालयाकडील आ.क्र.६९७५, दि.१२/१०/२०२३ रोजीचे पत्र.

४) वंचित बहुजन युवा आघाडी,पुणे शहर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष युवा आघाडी यांचे पत्र.

५) मा.विधानसभा सदस्य, सुनिल विजय टिंगरे यांचे इकडील आ.क्र.११२२,दि.२०/५/२०२४ रोजीचे पत्र.

६) मा.उपमहापौर,डॉ.श्री.सिध्दार्थ धेंडे यांचे इकडील कार्यालयाकडील आ.क्र.१२००२, दि.१७/३/२०२५ रोजीचे पत्र.

७) यश फाऊंडेशन यांचे इकडील कार्यालयाकडील आ.क्र.३९१,दि.८/४/२०२५ रोजीचे पत्र.

८) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/४२,दि.१७/४/२०२५ चे पत्र.

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

विश्रांतवाडी येथील मुकुंदराव आंबेडकर चौक या ठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या संदर्भ क्र.२ अन्वये मुख्य सभा ठराव क्र.१५४,दि.२८/६/२०१८ रोजी मान्यता मिळालेली होती. परंतु मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या संदर्भ क्र.१च्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार पुतळा उभारणेसाठी पारित केलेले ठराव एक वर्षापेक्षा जुने असू नयेत असे नमूद आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी पुनश्च मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका